साधारण जुलै १९९१ पासून जागतिकीकरण आणि खुले आर्थिक धोरण आपल्या देशात प्रथमता आले. खुली बाजारपेठा आणि आपला माल इतर देशांना भारतीय बाजार पेठेत विक्री करण्याची संधी ह्या व्यवस्थेला पहिल्यांदा मिळाली. याची पाळेमुळे डंकेल प्रस्ताव आणि जागतिक व्यापार संघटना यात रुजलेली दिसतात.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 213 : Impact of Globalization on Language & Literature
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
January-2020

भारत हा विकसनशील देश असल्याने ह्याची बाजारपेठ इथे मिळेल या आशेवर खा ऊ जा धोरण इथल्या व्यवस्थेने स्वीकारले. जागतिकीकरणामुळे सर्वच क्षेत्रांचा चेहरा मोहरा बदलून गेला. त्यात विशेष पडसाद उमटले ते राजकीय, सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक साहित्यिक क्षेत्रात. आणि त्यातही देशात झालेल्या आकस्मिक बदलाचा प्रभाव साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रावर जास्त प्रमाणात दिसून येतोय. त्याची नोंद इथल्या साहित्यिकांनी विशेष म्हणजे कवींनी जास्त प्रमाणात घेतल्याचे दिसून येते. याचा प्रभाव इथल्या सामाजिक जीवनावर झाल्याने कवींनी आपली भडास आपल्या काव्याच्या माध्यमातून काढण्याचा प्रयत्न केला. जागतिकीकरणा पूर्वीच्या कविता आणि जागतिकीकरणानंतरच्या कविता यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आढळते. कवितेतील प्रतिमा , विशिष्ट शब्द रचना, कवितेचा आशय, संवेदना, शीर्षके, यांत ठळकपणे बदल जाणवतो. हा परिणाम जागतिकीकरणाच म्हणावा लागेल. मराठी कवितेत याची विशेष नोंद आंबेडकरी साहित्यातील कविता आणि कादंबरीत घेतली गेली आहे.

जागतिकीकरणामुळे समाजात मोठ्या प्रमाणात उलथापालथ झाली. यामध्ये सर्वसामान्य गरीब यात जास्त भरडला गेला. परंतु जागतिकीकरणामुळे प्रत्येक माणसाच्या विकासाचा आभासी आलेख दाखविला जातोय. असे अनेक कवींना वाटू लागले. अचानक आलेल्या या नवीन संस्कृतीमुळे समाजातील अनेक नैतिक बाबींवर कसा विपरीत परिणाम होत आहे हे अनेक कवींनी आपल्या कवितांमधून यथार्थपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

RESEARCH JOURNEY

कवी अरुण काळे असं म्हणतात,
"ही सनातन मोड्स ऑपरेंडी
ही उपेक्षा, ही अवहेलना
ही पाताळयंत्रे ,ही खुन्नस
हे वैचारिक चळवळीचे कबरस्तान
हे जागतिकीकरण" ८

जागतिकीकरणाच्या परिणामांचा वेध कवी अरुण काळे यांच्यासोबत कवी मोतीराम कटारे, महेंद्र भवरे, अविनाश गायकवाड, लोकनाथ यशवंत, उत्तम कांबळे, केतन पिंपळापुरे , प्रज्ञा लोखंडे, रोहन नागदिवे, महेंद्र गायकवाड यांनी आपल्या कवितांमधून घेतलेला आहे.

**कवी मधुकर जाधव यांच्या कवितेवरील जागतिकीकरणाचा प्रभाव :**

कवी मधुकर जाधव यांच्या साहित्याचा आलेख तपासताना त्यांच्या साहित्याचा प्रवास सामाजिक गीते, कविता, कथा, कादंबरी, वैचारिक लेखन आणि स्फुटलेखन असा आहे. मधुकर जाधव यांची कविता समजावून घेताना लोककवी वामनदादा कर्डक हे सिन्नरच्याच मातीतले. त्यांच्या सोबत मधुकर जाधव आणि अनेक समकालीन भिमशाहीर होते. संदर्भ इथे लक्षात घ्यावा लागतो. जागतिकीकरणामुळे देशात जो ग्लोबल

Scanned with CamScanner

गोंधळ निर्माण झाला त्याची झळ त्यांचे गुरुमाग मिळण्या जास्त प्रमाणात बसली आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यात जागतिकीकरणाच्या प्रभावाचे वास्तव चित्रण आलेले दिसते.

त्यांचे पहिले दोन काव्यसंग्रह 'अस्तित्वाच्या वाटा' आणि अंधार यात्रीचे उत्खनन यामध्ये समाजातील विषमता , गरिबी, दुःख , दारिद्र्य , दैन्य, वेदना, विद्रोह याचे वास्तव चितारताना दिसतात. परंतु नंतर आलेले दोन काव्यसंग्रह 'ग्लोबल बाराखडी' आणि , महासत्तेचा तळठाव शोधताना' ह्यामधील कविता प्रामुख्याने जागतिकीकरणाच्या वास्तव आणि तळागाळातील घटकावर झालेल्या परिणामांचा आलेख रेखाटताना दिसतो.

"मोठ्या कंपन्या आल्या
काही थांबल्या काही फायदा करून पळाल्या
स्थानिकाला ना काम ना रोजगार
गेली जमीन भूमिहीन शेपटापासून गार
नापीक जमीन सेझच्या जाळ्यात
पिकणारी तोंड्यात गुंतवणुकीच्या कोठ्यात
कुणीही यावं लावावं पैका करावा धंदा
माणूस इथून तिथून केलाय परागंदा" ९

जागतिकीकरणाने एक प्रकारे सामाजिक भूकंपच करून इथला भूमिपुत्र आणि भूमी आपल्या ताब्यात घेऊन एक प्रकारची नवी गुलामी लादण्याचा प्रयत्न केला गेला आहे. असेच कवीला सांगावयाचे आहे. जागतीकरणामुळे ज्या नवीन कंपन्याचे जाळे इथे विणले जात आहे. त्याचा आर्थिक फायदा इथल्या भांडवलदारांना कसा मिळतो. हेच कवीला सूचित करावयाचे आहे.

"पैशाच्या पुरातून
भांडवलदाराचे विकेंद्रीकरण
खेड्यातून थाटतयं
रिसोर्ट मॉल न्यू सिटी
नवा ऑक्सिजन मिळविण्यासाठी
प्रत्येकजण झालाय ब्रोकर
जमीन जुमल्याची खरेदी विक्री
वसलाय विकून स्व:तला" १०

पैशाच्या जोरावर इथे भांडवलदार येऊन इथली जमीन स्वस्तात खरेदी करून हॉटेल चालू करून इथल्या जंगलावर ताबा मिळवून सिमेंटची जंगले थाटत आहेत. इथला मुक्त वारा, पाणी बाटलीत भरून इथेच विक्री करण्याचे धोरण सर्रास राबविले गेले आहे. हे वास्तव चित्र त्यांच्या कवितेतून येताना दिसते.

*"राष्ट्रीयीकरणाच्या कुरणात चरून मोकळे
गोळा समस्त ब्लॅकमनी घुसलाय
ग्लोब्रोलायझेशनच्या नव्या खेड्यातून
जागतिकीकरणाच्या कोंडवाड्यात
खाजगी करणाच्या गराड्यात" ११*



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
January-2020

सामाजिक लोकशाही या देशात नांदत असताना राष्ट्रीयकरणाला इथे खोडा घालण्यात हे खाऊजा धोरण यशस्वी ठरले आहे. हे कवी सहजपणे सांगून जातोय. जागतिकीकरण हा एक कोंडवाडा कसा आहे आणि काळ्या पैशाच्या जोरावर इथे नवीन वसाहतवाद होऊ घातला आहे. हे कवीला सांगावयाचे आहे.

*"खाऊजा धोरणाचे अॅसिड बल्ब*
*लावलेत इथल्या प्रत्येक ग्लोबोलायझेशन खेड्यात*
*राष्ट्रीय संपत्तीचं खाजगीकरण*
*उदात्तीकरणाच्या जाळ्यात कोंडी करत*
*जागतिकीकरणाची मोठी बाजारपेठ*
*सारी पेटंट ठेवलीत लिलावात ...." १२*

जागतिकीकरणाची दुषित हवा समृद्ध आणि संपन्न असलेल्या खेड्यांना एक प्रकारे उध्वस्त करण्याचे काम करत आहे . इथली राष्ट्रीय निसर्ग संपत्तीवर संशोधन करून त्याचे पेटंट आपल्या नावावर करण्याचा केविलवाणा प्रयत्न खाऊजा या धोरणाने चालविला आहे. हेच भयाण वास्तव कवीने आपल्या कवितेतून मांडले आहे.

## निष्कर्ष आणि मूल्यमापन

जागतिकीकरणाच्या विशाल महाकाय अशा जाळ्यात आपला समाज पूर्णतः गुरफटून गेलेला आहे. आणि त्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक या सर्वच क्षेत्रांना अनपेक्षित बदलांना सामोरे जावे लागत आहे. अनेक नवनवीन तंत्रज्ञान आज मानवाच्या अस्तित्वास धोका पोहचवत आहे. आणि त्यातून प्रचंड प्रमाणांत हानी होत आहे. जागतिकीकरणामुळे आपली संस्कृती लयाला जाताना दिसते. ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. त्यातूनच नैतिक मुल्यांचा ऱ्हास होवून आज माणूस खुनशी , हिंसक , स्वार्थी बनला आहे.

तंत्रज्ञानाचा विकास उंचावत असताना माणूस मात्र खाली घसरताना दिसत आहे. हा जागतिकीकरणाचा समग्र परिपाक म्हणावा लागेल. यंत्राच्या संगतीत वावरणारा माणूस आज भावनाशून्य बनला आहे. याचीच मनात माठलेली ठसठस कवी मधुकर जाधव यांनी आपल्या 'ग्लोबल बाराखडी' आणि 'महासत्तेचा तळठाव शोधताना' या दोन काव्यसंग्रहांतून समर्थपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कवी मधुकर जाधव हे दुष्काळग्रस्त तसेच अनेक समस्यांच्या गराड्यात असणाऱ्या सिन्नरसारख्या ग्रामीण भागातून असल्यामुळे आपल्या आसपासच्या समाजातील दुःख, वेदना जवळून बघतात. हे त्यांच्या लेखणीतून प्रकर्षाने जाणवते. जागतिकीकरणाचा एक समग्र लेखाजोखा आपल्या समोर मांडतात.

कवी अरुण काळे यांनी जागतिकीकरणामुळे समाजात पसरलेली अनैतिकता, भ्रष्टाचार हे आपल्या काव्यातून मांडून आपली भडास काढण्याचा प्रयत्न केला आहे. यात सर्वसामान्य घटकाचे कसे मरण झाले हेच सांगण्याचा प्रयत्न कवी पोटतिडकीने करत आहे.

जागतिकीकरणामुळे बदललेल्या जगाचा चेहरा-मोहरा दाखविण्याचा प्रयत्न कवी उत्तम कांबळे यांनी केलेला दिसून येतो. त्यांनी या बदललेल्या स्थितीमुळे कृषीसंस्कृतीचा कसा बळी घेतला आहे हे वेळोवेळी

Scanned with CamScanner

सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. जागतिकीकरणामुळे यंत्रसामुग्री उदयास येऊन शेतीच्या उत्पन्नात वाढ झालेली असली तरी अस्सलपणा, खरी संस्कृती लयाला गेली असून शेतकरी आत्महत्या, शेतकर्यांची फसवणूक हे प्रकार वेगाने वाढत असल्याचे कवी सांगतात.

जागतिकीकरण, खासगीकरण, आर्थिक उदारीकरण यामुळे आपल्या समाजाचे अस्तित्व किती आणि कसे धोक्यात आहे हे कवी अत्यंत साध्या शब्दात सांगून जातात.

**संदर्भ ग्रंथसूची**

1. इंगळे अशोक रा. - नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेची मीमांसा, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. प्र. आ. २० मार्च २०१८ पृ. क्र. ४९.
2. जाधव मधुकर, प्रसेनजीत - भारतीय जनता मासिक, मयूर प्रिंटर्स, ऑक्टोबर २०१५ पृ. क्र. २०.
3. काळे - नंतर आलेले लोक (कविता), लोकवाङ्मयगृह, मुंबई प्र. आ. २००६ पृ. क्र. ९६
4. जाधव मधुकर - ग्लोबल बाराखडी, गोदा प्रकाशन, औरंगाबाद प्र. आ. जानेवारी २०१३ पृ. क्र. २५, पृ. क्र. ७०.
5. विकिपीडिया शब्दकोश
6. जाधव मधुकर - महासत्तेचा तळठाव शोधताना (कविता), गोदा प्रकाशन, औरंगाबाद प्र. आ. १४ ऑक्टोबर २००९ पृ. क्र. ८१. पृ. क्र.२७ .

## COSMOS IMPACT FACTOR

Search Journal | Search

REQUEST IF



Category

SAMPLE CERTIFICATE


SAMPLE EVALUATION SHEET

### Journal Detail

| | |
|---|---|
| Journal Name | RESEARCH JOURNEY |
| ISSN/EISSN | 2348-7143 |
| Country | IN |
| Frequency | Quarterly |
| Journal Discipline | General Science |
| Year of First Publication | 2014 |
| Web Site | www.researchjourney.net |
| Editor | Prof. Dharraj Dhangar & Prof. Gajanan Wankhede |
| Indexed | Yes |
| Email | researchjourney2014@gmail.com |
| Phone No. | +91 7709752380 |
| Cosmos Impact Factor | 2015 : 3.452 |

## GIF GLOBAL IMPACT FACTOR

Due to large number of application please allow us time to update your journal



**Get Involved**

- Home
- Evaluation Method
- Journal List
- Apply for Evaluation/Free Service
- Journal Search

**Recently Added Journals**

| Research Journey | |
|---|---|
| ISSN | 2348-7143 |
| Country | India |
| Frequency | Quarterly |
| Year publication | 2014-2015 |
| Website | researchjourney.net |
| Global Impact and Quality Factor | |
| 2014 | 0.565 |
| 2015 | 0.676 |

## Research Journey

**SJIF 2019:**

**6.625**

Area: Multidisciplinary

Evaluated version: online

**Previous evaluation SJIF**

2018: 6.428
2017: 6.261
2016: 6.087
2015: 3.986

**The journal is indexed in:**

SJIFactor.com

**Basic information**

| | |
|---|---|
| Main title | **Research Journey** |
| Other title [English] | Research Journey |
| Abbreviated title | |
| ISSN | 2348-7143 (E) |
| URL | http://WWW.RESEARCHJOURNEY.NET |
| Country | India |
| Journal's character | Scientific |
| Frequency | Quarterly |
| License | Free for educational use |
| Texts availability | Free |

**Contact Details**

| | |
|---|---|
| Editor-in-chief | Prof. Dhanraj Dhangar<br>M.G.V.'S ARTS & COMMERCE COLLEGE, YEOLA, DIST NASHIK<br>India |
| Publisher | MRS. SWATI SONAWANE |

**SWATIDHAN PUBLICATIONS** **Price : Rs. 800/-**

**For Details Visit To : www.researchjourney.net**

Scanned with CamScanner

Satyaniketan's

# Adv. Manoharrao Nanasaheb Deshmukh
# Arts, Science and Commerce College, Rajur

## Tal. Akole, Dist. Ahmednagar

Best College Award of SPPU, Pune

NAAC Accredited 'A' Grade

## STATE LEVEL SEMINAR

ON

जागतिकीकरणाचा भाषा व साहित्यावरील प्रभाव

वैश्वीकरण का हिन्दी भाषा और साहित्य पर प्रभाव

**Impact Of Globalization On Language and Literature**

(Sponsored under Quality Improvement Programme of SPPU, Pune)

# CERTIFICATE

*This is to certify that Prof./Dr. /~~Mr.~~/Ms.* Mangal Kacharu Sangale *of* Sangamner College, Sangamner.

*Participated as a Delegate/Resource Person/Chairperson/Keynote Speaker for State Level Seminar Organized by the Departments of Marathi, Hindi and English of Satyaniketan's Adv. M.N. Deshmukh College, Rajur held on 10th & 11th January 2020. He/She Presented a Research Paper entitled* कवी मधुकर जाधव यांच्या कवितेवरील जागतिकीकरणाचा प्रभाव.

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. D. K. Gandhare | Dr. B. T. Shenkar | Prof. B. R. Hole | Dr. B. S. Deshmukh |
| Coordinator | Coordinator | Coordinator | Principal & Chief Organizer |

Scanned with CamScanner


# YEAR

# 2020-21

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



## लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक

मंगल रूपराव सांगळे

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

● संपादक ●

**डॉ. शिवाजी हुसे**

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद– ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्षक / लेखक-संशोधक | पृ. क्र. |
|---|---|---|
| 1. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातील शैक्षणिक जाणिवा<br>- प्रा. नागेश बोंतेवाड | 1 - 4 |
| 2. | वामनदादा कर्डक : आंबेडकरी गीतकार<br>- प्रा. विजयश्री विठ्ठल गवळी | 5 - 8 |
| 3. | डॉ. बाबासाहेबांचे बुद्धत्व विशद करणारी वामनदादांची कविता<br>- प्रा. डॉ. विश्वजित कांबळे | 9 - 15 |
| 4. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील शैक्षणिक तत्त्वज्ञान<br>- डॉ. मारोती गायकवाड | 16 - 23 |
| 5. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील स्त्री-जाणिवा<br>- प्रा. डॉ. रामकिशन दहिफळे | 24 - 26 |
| 6. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील आंबेडकर दर्शन<br>- डॉ. संतोष देशमुख | 27 - 31 |
| 7. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान (शैक्षणिक)<br>- प्रा. कातकडे केशव श्रीरंग / प्रा.डॉ. रमाकांत का. गजलवार | 32 - 36 |
| 8. | आंबेडकरी ऊर्जा पुरवणारे समर्थ लोककवी वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. दादाराव गुंडरे | 37 - 41 |
| 9. | लोककवी वामनदादा कर्डक यांचे गीतलेखन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>- मंगल कचरु सांगळे | 42 - 47 |
| 10. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातून प्रकट झालेले आंबेडकरी विचार<br>- प्रा. डॉ. लालबा दुमटकर | 48 - 50 |
| 11. | वामनदादा कर्डकांचे काव्य : आंबेडकरी विचार चळवळीची शिदोरी<br>- प्रा. कैलाश माणिकराव मुटकुळे | 51 - 54 |
| 12. | 'माझ्या जीवनाचं गाणं' : एका लोककलावंताचा जीवन संघर्ष<br>- प्रा. डॉ. आनंद वारके | 55 - 59 |
| 13. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान<br>- डॉ. महालक्ष्मी मोराळे | 60 - 65 |




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 14. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील बुद्ध तत्वज्ञान<br>- श्री. विजयकुमार बुद्धप्पा झुंबरे | 66 - 69 |
| 15. | लोककवी वामनदादा कर्डक यांचा कवितेतील भीमदर्शन<br>- प्रा. डॉ. हनुमंत लक्ष्मण भवारी | 70 - 74 |
| 16. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील क्रांतिकारकता<br>- डॉ. सागर गवई | 75 - 77 |
| 17. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- डॉ. वर्षा दिगंबर गायकवाड | 78 - 82 |
| 18. | महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनाचे गीतकार<br>- प्रा. डॉ. प्रविण वसंतराव चव्हाण | 83 - 85 |
| 19. | लोककवी वामनदादा कर्डक यांची लोकगीते<br>- डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे | 86 - 89 |
| 20. | आंबेडकरी चळवळीतील समाजप्रबोधक : वामनदादा कर्डक<br>- श्री. धनंजय वसंत भाट | 90 - 93 |
| 21. | लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य<br>- डॉ. देवयानी चव्हाण | 94 - 97 |
| 22. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांतील सामाजिकता<br>- विद्या कुलकर्णी | 98 - 103 |
| 23. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- प्रा. राजा जगताप | 104 - 107 |
| 24. | लोककवी वामनदादा कर्डक यांची गझल रचना<br>- प्रा. डॉ. सुनील गणपत घनकुटे | 108 - 111 |
| 25. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिक विचार<br>- प्रा. केशव विठ्ठल कोकाटे | 112 - 113 |
| 26. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- शीला विठ्ठलराव डोंगरे | 114 - 117 |
| 27. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातील स्त्री<br>- डॉ. कैलास सोनू महाले | 118 - 121 |
| 28. | मानवतेची हाक देणारा कवी : वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. व्यंकटी पावडे | 122 - 125 |




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 29. | आंबेडकरी चळवळीत वामनदादा कर्डक यांचे योगदान<br>- प्रा. डॉ. किशोर शेषराव चौरे | 126 - 129 |
| 30. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील परिवर्तनवादी विचार<br>- डॉ. नंदकुमार माने | 130 - 132 |
| 31. | महाकवी - वामनदादा कर्डक आणि कार्य<br>- प्रा. डॉ. राहुल यशवंतराव निकम / प्रा.डॉ.मारोती निवृत्ती गायकवाड | 133 - 137 |
| 32. | बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची पेरणी करणारा महाकवी वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. उत्तम जकोजी सोनकांबळे | 138 - 142 |
| 33. | वर्ग लढ्याची जाणीव देणारे महाकवी वामनदादा<br>- डॉ. समाधान इंगळे | 143 - 146 |
| 34. | वामनदादा कर्डक यांची आंबेडकरी गीते<br>- डॉ. रामलीला सुदामराव पवार | 147 - 152 |
| 35. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या लोकगीतातील सामाजिकता<br>- डॉ. यशवंत सोनुने | 153 - 155 |
| 36. | प्रतिभावंत लोककवी शाहीर वामन (दादा) कर्डक<br>- प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी | 156 - 159 |
| 37. | वामनदादा कर्डक - व्यक्ती आणि वाङ्मय<br>- प्रा.डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक | 160 - 162 |
| 38. | महाकवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरवाद<br>- प्रा. डॉ. शिवदास कान्हुजी इंदोरकर | 163 - 168 |
| 39. | लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि वाङ्मयातील काव्याचे स्वरूप<br>- प्रा. सिद्धार्थ इंगोले | 169 – 172 |
| 40. | मूल्यदृष्टीचा कवी : वामनदादा कर्डक<br>- प्रा. संतोष लोंढे | 173 - 175 |
| 41. | भीमशाहीर : वामनदादा कर्डक<br>- ललिता मानसिंग गोपाळ | 176 - 178 |
| 42. | वामनदादा कर्डकांच्या लेखनातील सामाजिकता व मानवता विषयक विचार<br>- राहुल संभाजी पंडित | 179 - 182 |
| 43. | वामनदादा कर्डक यांच्या गीतांमधून झालेले समाजप्रबोधन<br>- प्रा. डॉ. गणपत काशिबा हराळे | 183 - 188 |




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 44. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातील सामाजिकता<br>- डॉ. मिलिंद भगवानराव बचुटे / - सुधाकर चौधरी | 189 - 191 |
| 45. | लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य<br>- डॉ. योगिता देवगिरीकर | 192 - 194 |
| 46. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- प्रा. मनिषा डोंगरे | 195 - 197 |
| 47. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांतील मानवीमूल्य व संविधानत्मक विचार<br>- प्रा. डॉ. भरत दशरथ खंडागळे | 198 - 201 |
| 48. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- प्रा. ज्ञानेश्वर कांबळे | 202 – 204 |
| 49. | कवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील 'माणूस'<br>- प्रा डॉ डांगे दत्तात्रय महादेव | 205 - 208 |
| 50. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान<br>- डॉ. अंजली दशरथ काळे | 209 - 212 |
| 51. | आंबेडकर चळवळीचे गायक वामनदादा कर्डक यांचे समाज प्रबोधनातील योगदान<br>- डॉ सुरेश किशन भदरगे | 213 - 217 |
| 52. | वामनदादा कर्डक यांचे ललित साहित्य<br>- नयन काशीनाथ राणे | 218 - 221 |
| 53. | वामनदादांच्या कवितेतील सामाजिकतेला आंबेडकरी तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान<br>- प्रा. सारिका शिवाजीराव पासंगे | 222 - 225 |
| 54. | महाकवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान<br>- प्रा.डॉ. शैलजा श्रीधर शिंदे | 226 – 229 |
| 55. | वामनदादांच्या गझलेतील संग्रामशीलता<br>- डॉ. प्रकाश राठोड | 230 – 236 |
| 56. | समतेची क्रांतिगीते गाणारा लोककवी : वामनदादा कर्डक<br>- डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे | 237 – 243 |
| 57. | वामनदादा कर्डकांच्या गीतातील सामाजिक पर्यावरण<br>- प्रा. डॉ. कल्पना नारायण गावडे | 244 – 247 |
| 58. | शाहीर वामनदादा कर्डक यांच्या गझलेचा आकृतिबंध<br>- गजानन भुसरे | 248 - 252 |




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 59. | महागीतकार वामनदादा कर्डक यांच्या गीतातील समग्रता<br>- अविनाश साळवी / प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ | 253 – 255 |
| 60. | लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य<br>- मनिषा एकनाथ थुट्टे | 256 - 258 |
| 61. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- प्रा. संदीप परदेशी | 259 - 261 |
| 62. | वामनदादा कर्डक यांच्या लेखनातील वैविध्यता<br>- डॉ. कैलास इंगळे | 262 - 264 |
| 63. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील गीतभीमायन<br>- डॉ. युवराज धबडगे | 265 - 269 |
| 64. | महाकवी वामनदादाचे शैक्षणिक तत्वज्ञान<br>- प्रा. विजय देविदास वाकोडे | 270 - 274 |
| 65. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान<br>- अमोल जयदेव वानखेडे | 275 - 277 |
| 66. | आंबेडकरी चळवळीचे क्रन्तिवाहक - वामनदादा कर्डक<br>- डॉ. संतोष बनसोड | 278 - 283 |
| 67. | आंबेडकरी शाहीर : वामनदादा कर्डक<br>- प्रा.सौ. नंदा निवृत्ती मास्कर | 284 - 287 |
| 68. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातील आशयसौंदर्य व विषयविविधता<br>- प्रा. लक्ष्मी नरहरी पवार | 288 - 290 |
| 69. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरवादी तत्वज्ञान<br>- शितल अण्णासाहेब सुसरे | 291 - 294 |
| 70. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- सतीश जमधाडे | 295 - 297 |
| 71. | लोककवी वामनदादा कर्डक यांची गझल रचना<br>- प्रा.डॉ. रविकांत शिंदे | 298 - 302 |
| 72. | शाहीर वामनदादा कर्डक यांच्या गझलेचा आकृतिबंध<br>- ज्योती स्वामी | 303 - 308 |




Scanned with CamScanner



# लोककवी वामनदादा कर्डक यांचे गीतलेखन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर


- डॉ. रावसाहेब दशरथ ननावरे

- मंगल कचरु सांगळे
संगमनेर महाविद्यालय, संगमनेर
ता. संगमनेर, जि. अहमदनगर
इ-मेल : sangalcm704@gmail.com


---

वामनदादा कर्डक यांचे मराठी साहित्यातील असलेले योगदान विशेष आहे. आंबेडकरी साहित्याला खऱ्या अर्थाने समृध्द करणारं साहित्य वामनदादांमुळे मिळालं असं म्हटल्यास वावगं ठरु नये वामनदादाचं साहित्य वाचल्यानंतर त्यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर असलेली असीम निष्ठा हेच त्यांच्या साहित्याचे प्रमाणशास्त्र असल्याचे लक्षातयेते नाशिक जिल्ह्यातील सिन्नरसारख्या दुष्काळग्रस्त तालुक्यातील देशवंडी हे वामन दादांचे गाव. एका छोट्याशा खेडेगावातील वामनदादा आज आंबेडकरी साहित्यासोबतच पूर्ण मराठी साहित्यासोब्रतच पूर्ण मराठी साहित्यात अजरामर झाले ते केवळ त्यांच्या लेखणीमुळे, यात शंका नाही. त्यांच्या याच लेखणीला बळ देण्याचं काम महामानव युगपुरुष डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या दैदिप्यमान विचारांनी केलं प्रस्तुत शोधनिबंधात लोककवी वामन दादा कर्डक यांच्या लेखणीवर आंबेडकरांचा किती व कसा प्रभाव होता, आंबडेकरांचे तत्त्वज्ञान त्यासाठी कसे दिशादर्शक ठरलं या गोष्टीचा परामर्श घेण्याचा मानस आहे.

**वामनदादा कर्डक :**

वामन तबाजी कर्डक हे नाशिक जिल्ह्यातील देशवंडी या गावचे. घरची परिस्थिती अत्यंत गरीबीची असल्याने त्यांचे शिक्षण होऊ शकले नाही. म्हणजे अगदीच जेमतेम अक्षरओळख होती त्यांची. घरातील गरिबीसोबत दोन हात करण्याची वेळ त्यांच्यावर खूपच कमी वयात आली. त्याचाच एक भाग म्हणून आई-वडीलांसोबत त्यांना मुंबई गाठावी लागली मिळेल ते आणि पडेल ते काम त्यांनी केले.

आंबेडकरी विचारांची असलेली प्रचंड ओढ त्यांना ऐन तारुण्यात आंबडेकरी चळवळीत घेऊन गेली शिवडी भागात वास्तव्याला असताना ते समता सैनिक दलात सहभागी झाले. देहलवी नावाच्या मास्तराकडुन ते बाराखडी व मुळाक्षरे शिकले वामनदादांच्या अंगी असलेले कलागुण उपजतच होते असे म्हणता येईल. त्यांचे गीतलेखन, गझललेखन किंवा गायनाचे संस्कार कुणीही केले नाही. स्वतःच्या आतील प्रतिभेच्या व सरस्वतीच्या वास्तव्यामुळे वामनदादा या गोष्टी स्वतः विकसित करू शकले.

१९४३ पासुन त्यांच्या गीतलेखनाची सुरुवात झाली त्यांना गीतलेखनाकडे घेऊन जाणारी किंवा आंबेडकरी चळवळीत घेऊन जाणारी एक सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रती असलेलीनिस्सीम श्रद्धा व प्रेम आणि हीच गोष्ट त्यांच्यातील उपजत कलागुणांना प्रेरित करुन व्यक्त होण्यास कारणीभूत ठरत गेली आणि वामनदादा आंबेडकरी विचारांच्या साथीने मार्गक्रमण करु लागले मानवमुक्तीचे पुरस्कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच वामनदादा कर्डक




Scanned with CamScanner

यांच्या लेखणीचे मुळ प्रेरणास्त्रोत आहे.

**वामनदादा कर्डक यांचे गीतलेखन :**

संपूर्ण जगाला मानवमुक्तीचा व समतेचा संदेश देणाया डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी वामनदादा कर्डक यांना अंतर्बाह्य बदलून टाकले बाबासाहेबांचा सहवास लाभला ही बाब त्यात विशेष महत्त्वाची म्हणावी लागेल. त्यांच्या प्रत्येक कृतीची मुख्य प्रेरणा बाबासाहेब असल्याचे ते स्वतःही मान्य करतात ते म्हणतात - "आमची प्रेरणा परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यांच्या प्रेरणेनेच चेतनाहीन समाजजागृती प्रचंड लाट उसळलेली, तिच्यात मीही आलोच, महाड, नाशिकचे संघर्ष यशस्वी झालेले. १९४३ साल उजाडलेले. त्या वेळी मी वयात न आलेला गिरणी मजूर मराठी समजत नव्हती. तरी माझ्या गीतलेखनास सुरुवात झाली"

मराठी भाषा समजत नसताना देखील वामनदादा यांनी बाबासाहेबांना केंद्रभूत मानून गीत रचना करण्यास सुरुवात केली. ही बाब वामनदादांच्या मनातील बाबासाहेबांप्रती असलेली निष्ठा किती होती हे स्पष्ट करण्यास कारणीभूत होती, असे म्हणता येते. बालवयातच अवजड कामांची जबाबदारी अंगावर पडल्याने वामनदादांची समज लवकरच वृध्दिंगत झाली, असेही म्हणता येते.

बाबासाहेबांच्या प्रेरणेतून वामनदादांनी आयुष्याच्या अंतापर्यंत आंबेडकरी चळवळीचा भाग म्हणुन लेखन, गायन केले. त्यांनी जवळपास पाच हजारापर्यंत गीते केवळ बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व, जीवनकार्य, तत्त्वज्ञान, चळवळ या विषयांवर लिहिली आहेत. त्यात विशेष करुन वामन दादांच्या गझलेचा देखील विचार करावा लागतो. आंबेडकरी कवितेला गझलेच्या माध्यमातुन एका वेगळया ढाच्यात ते व्यक्त झाले आणि आंबेडकरी गझलेला एक स्वतंत्र अस्तित्व निर्माण करुन दिले वामनदादांनी मराठी चित्रपटांसाठी देखील गीतलेखन केले तसेच लोकगीतेही त्यांनी लिहीली

हिंदी-मराठी-आंबेडकरी बुध्दगीते अशा स्वरुपाची काव्यसंपदा त्यांनी निर्माण केली. सहा हजारांपेक्षा अधिक गीतांचे भांडार त्यांच्या नावावर आहे ही बाब यासाठी विशेष म्हणावी लागेल, कारण शिक्षणासोबतची नाळ तुटलेली असताना अगदी थोडी अक्षर ओळख असताना देखील इतकी अफाट व दर्जेदार अशी गीतरचना करणे सोपी गोष्ट नव्हती. आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व आणि मानवमुक्तीचा संदेश देणारे वैश्विक विचार यांनी त्यांच्या मनावर गारुड केले होते त्यामुळे वामनदादा ही अशक्य गोष्ट शक्य करु शकले. परिस्थितीने जरी वामनदादांना शिकण्यापासून दुर ठेवलेले असले तरी त्यांच्या अंगी असलेल्या जिद्द व जिज्ञासा यामुळे त्यांनी स्वयं-अध्ययनातून त्यांनी खूप गोष्टी आत्मसात करण्याचा प्रयत्न केला आणि मराठी गीतलेखन करत असताना हिंदी गीतलेखनाचा देखील आवर्जून अभ्यास केला. त्यांनी हिंदीतही गीत रचना केलेली असून तीही प्रसिध्द आहे.

"उर्दुतले गझल, खमसा, नज्म हे सारे प्रकार मी मराठीत व हिंदीत आणले"[२] अशी नोंद स्वतः वामनदादा कर्डक यांनी त्यांचे आत्मचरित्र माझ्या 'जीवनाचं गाणं' यात उल्लेख केलेला आहे. याचा अर्थ वामनदादांनी उर्दू गझलांचा अभ्यास केलेला होता.

**वामनदादा यांच्या गीतलेखनाची मुख्य प्रेरणा : डॉ.बाबासाहेब आंबेडकर-**

वामनदादा कर्डक यांनी स्वतःला आंबेडकरवादी चळवळीत पूर्णपणे वाहून घेतले होते. त्यांच्या प्रत्येक कृतीमागील हेतु आंबेडकरी चळचळीस वेगाने पुढे नेणे हाच होता त्यांनी चळवळीसाठी जे जे केले त्यातील एका सर्वांत मुख्य भाग त्यांचे गीतलेखन हा म्हणता येईल आणि या गीतामागील मुख्य प्रेरणास्त्रोत होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर! हे स्वतः वामनदादा देखील अनेकदा मान्य करतात.

वामनदादा ज्यावेळी आंबेडकर चळवळीत सक्रीय सहभागी होते, त्याकाळी आजच्या सारखी लोकांपर्यंत सर्वदूर पोहचलेली माध्यमे नव्हती. चळवळीतील सुरु असलेल्या बाबी लोकांपर्यंत पोहचले ते चळवळीतील गीतांच्या माध्यमातून वामनदादांचे गीतलेखन ख-या अर्थाने याही प्रेरणेने पुढे आले. डॉ. बाबासाहेबांच्या भाषणातील आशयच हे गीतकार आपल्या गीतांत लिहून लोकांसमोर घेऊन जाऊ लागले आणि चळचळीस योग्य दिशा मिळू लागली

"वामनदादांच्या गाण्याची सुरुवात ज्या गीताने झाली त्याची पार्श्वभुमीही त्यांनी सांगितलेली आहे-१९४२ चा छोडो



Scanned with CamScanner

भारत' हा नारा सा-या भारतवर्षात घुमघुमत होता . मी डॉ. बाबासाहेबांच्या नरे पार्क मैदानावरील सभांना जात होते समता सैनिक दलाच्या संचलनात सहभागी होऊन संचलन करीत होतो एक न्यारीच धुंदी होती; वाहुन घेण्याची व वाहुन जाण्याची. अशाच एका सभेच्या वेळी कार्यकर्त्यांनी मला स्टेजवर चढवले आणि म्हटले. म्हणा वामन गाणं. तेव्हा सहजपणे माझ्या तोंडातून शब्द बाहेर पडले -

आज कितने दिनों से हमको अछुत कर के पुकार है।

वामनदादांच्या गाण्याची हीच सुरुवात असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले आहे[३]

वरील गोष्टीवरुन एक नक्की म्हणता येते की, वामनदादा यांचे गीतलेखन चळवळीच्या माध्यमातून साकारले गेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपले सर्वस्व मानणा-या वामनदादांच्या गीतांच्या नेहमीच शक्य होईल तितक्या उत्कटतेने बाबासाहेबांचे सर्वसामान्य गरीब जनतेच्या जीवनात नेमके काय स्थान होते, ते स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. "अंतःकरणाच्या पाठीवर दीनदुबळ्या समाजाच्या युगे युगे जो राहील तो भीम माझा ठसा होता काय सांगु तुला वामन भीम माझा कसा होता सात ठिगळांच्या बंडीचा भीम माझा खिसा होता"[४]

दलित समाजाच्या बाजुने सदैव उभ्या असणा-या महामानवाप्रति असणारा विश्वास वामनदादांच्या प्रत्येक शब्दातून दिसून येतो. भीम कसा होता, हे त्यांनी खूपच मार्मिकपणे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि त्यांच्या काव्यातील सहजता तात्काळ वाचकाच्या मनाचा ठाव घेते. आंबेडकरांचे अस्तित्व असे एका क्षणात किंवा एका युगात संपणारे नसून आणखी कित्येक युगे तुमच्या आमच्या मनावर हृदयावर राज्य करणार असल्याचा विश्वास ठामपणे वामनदादांच्या गीतांतून सहजपणे दिसुन येतो. वामनदादांच्या मनातील भीम व त्यांच्या बद्दल असणार आदर अभिमान हा आंबेडकरांच्या नंतरही तसाच त्यांच्या गीतांतून दिसून येतो

"मला चीड येत नाही हाच माझा गुन्हा दोष देऊ कुणा, सांगा दोष देऊ कुणा आहे तेच माझे गांव आणि तेच गांवकरी माझा भीम असताना कापायचे थरथर गेला गेला भीमराणा, आला नेभळटपणा क्रूर कठोर काळाशी जरी गाठ होती माझी आज माझ्यातला भीम इथं मीच केला उणा"[५] आंबेडकरांचा सहवास लाभलेले वामनदादा बाबासाहेबांच्या नंतर दलित व बहुजन समाजातील लोकांची बदलत असलेली मानसिकता बघून अस्वस्थ होतात, कारण लोक हळूहळू बाबासाहेबांनी दिलेली शिकवण त्यांचे विचार विसरुन भरकटले आहेत म्हणून वामनदादा उदास होतात त्यांच्या मनातील ही अस्वस्थता त्यांच्या गीतलेखनातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आपण विसरत असलेले आंबेडकरांचे विचार सदैव स्मरणात असायला हवेत, हीच वामनदादा यांची मनापासुन इच्छा आहे. लोकांना आपण बदललो आहोत,चुकीच्या दिशेने जात आहोत, हेच कळत नसल्याने ते कमालीचे हताश होतात आणि अशावेळी नेमका कुणाला दोष द्यावा हेच त्यांना कळेनासे होते. बाबासाहेबांचे बोट पकडूनच त्यांचे गीत स्वर धरु लागतात इतकी जवळीकता, एकरुपता वामनदादा यांच्या गीतांत आणि बाबासाहेबांत झाल्याचे दिसते

"नको म्हणुन नाही, भीम आहे सर्व ठायी आहे त्याची कीर्ती, किर्तीला मृत्यु नाही
जाहला देहांत, तरी ही जिवंत दिसेल तुला माझा भीम भगवंत
जनहीत ज्यात असे मुर्तिमंत अमर आहेत त्याचे अनमोल ग्रंथ"[६]

वामनदादा यांच्या रक्तात भीमविचार ऑक्सिजन सारखं काम करत असल्याचं दिसतं. बाबासाहेबांचे अस्तित्व केवळ मृत्युने संपणारे नसुन ते सदासर्वकाळ सोबत असल्याचं ते म्हणतात. कारण बाबासाहेब म्हणजेच पददलित बहुजन वंचित समाजाचे वाली म्हणजे साक्षात भगवंतच!

भगवंत अमर असतो, त्याचे अस्तित्व हे सदैव असते तसेच बाबासाहेब हे अमरत्व प्राप्त झालेले किर्तीवंत युगपुरुष महान व्यक्तिमत्व आजही आहे आणि यापुढेही ते असणार आहे त्यांचे विचार हे वैश्विक असून ते अमर आहेत जनहिताचा त्यांच्या अस्तित्वाचा विचार करणारे संपूर्ण दलित समाजाचे कैवारी सर्वांसोबत आजही आहेत ते संपलेले नसून ते जिवंत आहेत. बाबासाहेब नसते तर आजही आपले जीवन गुलामीतच असते, त्यात कसलाही बदल झाला नसता, याची पुरेपूर जाणीव वामनदादा यांना होती आणि ती त्यांनी समाजातील बंधुभगिनींना गीतांतून सांगितली



Scanned with CamScanner

“गणतीत माझी गुलामात होती गणतीत माझी सलामत होती तोडलीस माझी गुलामाची बेडी अशी झुंजणारी तुझी जात होती. मला लाभलेली तुझी पाठराखण झाली आता विकासाची वाट नवे आज वामन कालची तुझी ही प्रेरणा उद्याच्या विकासात होती...”

पिढ्यानपिढ्या गुलामगिरीचं जोखड खांद्यावर वागविण्यात ज्यांची हयात गेली अशा वंचित समाजाला या चिखलातून बाहेर काढण्याचे अलौकिक काम बाबासाहेब करू शकले. पिढीजात बंधने झुगारण्याचं धाडस निर्माण केलं ते बाबासाहेबांनीच. एखाद्या ढाण्या वाघाप्रमाणे भीम लढला आणि माणूस म्हणून अस्तित्व नाकारलेल्या समाजातून ही गुलामगिरीची बेडी कायमची तोडली.

बाबासाहेबांनी सांगितलेला 'शिका, संघर्ष करा व संघटीत व्हा हा मुलमंत्र पुढे घेऊन जात आपण माणसाप्रमाणे विकासाची वाट चालु लागलो. भीमरायाचे हे अनंत उपकार, त्याचे भगवंत किती आपल्या गीतांतुन समाजापुढे ठेवुन झोपलेल्या समाजाला झोपेतून जागे करण्याचे काम वामनदादा यांनी केले आणि त्यांची साधी सरळ थेट काळजाला भिडणारी शब्दसुमनं लोकप्रिय झाली. बाबासाहेबांना वगळुन त्यांच्या गीतलेखनाचा विचार करता येणे शक्य नाही. तसे केल्यास धडापासुन काळीज दुर केल्यासारखे होईल, इतकी त्यांची गीते भीममय झालेली आहेत, हे मान्य करावं लागेल. भीम हा आमचा माय-बाप सर्वकाही असल्याचं वामनदादा सांगून जातात. स्वतःला भीमपुत्र म्हणण्यात त्यांची छाती अभिमानाने फुलुन येते.

“तुडवाया टपले तुला,
वैरान रानच्या फुला ही जाण असू दे तुला रे भीमरायाच्या मुला..

वडीलांनी आपल्याला लढण्यास सक्षम बनवले. आपल्या हाता-पायांतील बेड्या तोडल्या आणि आपल्याला माणसांत आणले. जगण्याचा हक्क मिळवून दिला. पण आता हे सर्व जपण्याचे काम आपल्याला करायचे असल्याचे वामनदादा आपल्या बांधवांना सांगू पाहत आहे आपण सर्व भीमपुत्र असून त्याचे विचार, सामर्थ्य आपल्या नसानसांत प्रवाही असेल तरच आपण ही लढाई पुढे नेऊन त्यात जिंकू. आजही हे युद्ध सुरु असून ते आता आपल्याला बाबासाहेबांनी दाखवलेल्या मार्गाने स्वबळावर लढायचे आहे.

आसपासची माणुसघाणी पिलावळ आपला घात करण्यास टपून आहे, आपल्याला ती वेळीच हेरता आली पाहिजे आणि आपलं अस्तित्व, हक्क आपण जपले पाहिजे. आपल्याकडे हा जो भीमाचा वारसा आला आहे, तो जपत हा लढा यापुढेही असाच लढायचा असल्याचे वामनदादा सांगतात
भीमपुत्रांचा हा सुरु असलेला लढा भीमाची जोपासलेली वैचारिक ठेवण आजही आम्ही शाबूत ठेवलेली असून याच जोरावर आज सर्वकाही बहरुन आल्याचं देखील वामनदादा सांगतात -

“तुझे रान भीमा ही सोन्याची खाण
तुझ्या लेकरांना आता काय वाण
तुवा पेरलेले तरारुन आले उभे शेत हिरवे,
नवे रुप आले तुझी आण भाकु,
खडे आज ठाकू तुझे रान राखु,
आणि सुख चाखू सुखाचाच ठेवा मिळाला महान
तुझ्या लेकरांना..”[१]

बाबासाहेबांनी पददलित समाजाच्या गुलामीच्या शृंखला तोडल्याने त्यांचे पूर्ण जीवन व राहणीमान यात कमालीचा बदल झाला. दुर्लक्षित झालेला एक मोठा समाज प्रवाहासोबत मार्गक्रमण करु लागला. भीमाने केलेले उपकार सदैव स्मरणात असून आपण हे ऋण कधी विसरणार नसल्याची ग्वाही वामनदादा आपल्या गीतांतून देतात.

महामानवाने केलेल्या या अद्वितीय अशा कर्तृवामुळे आपल्यात किती मोठा बदल झालेला आहे, हे ते अभिमानाने सांगतात. आपण भीमाची लेकरे असून आपल्या बापाने आपल्यावर केलेल्या या उपकारामुळे आज या लेकरांना कसलीच वाण नाहीये. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक बांधिलकी, वैज्ञानिक दृष्टीकोन यांसारख्या विचारांच्या पायावर बाबासाहेबांनी आज



Scanned with CamScanner

जी इमारत उभी केलेली आहे, तिचा डौलदारपणा व भिजाज याचा त्यांना विशेष अभिमान आहे. बाबासाहेबांनी सांगितलेल्या 'शिका, संघर्ष करा व संघटित व्हा या मूलमंत्राच्या आधारे विकासाची कास धरलेला बहुजन वंचित समाज आज वेगाने प्रगती करत असुन त्यांना आज कसली वाण भासत नाही. तसेच यात समाजातील जो घटक मागे राहीलेला आहे त्यालाही आता सोबत घेऊन पुढे-पुढे जायचे आहे.

भीमाकडुन मिळालेला हा ठेवा आम्ही असाच प्राणपणाने जतन करुन आणखी सुखाची चव चाखणार आहे. ते केलेली खूप मोठी माया असून आम्ही आता आधीच सर्वकाही मागे सोडून दिलेल्या मार्गावरुन चालत जाणार आहोत. बाबासाहेब हे तथागत गौतम बुध्द यांच्या बोटाला धरुनच आपल्या दीनदुबळ्या समाजाला समतेच्या मार्गाने पुढे घेऊन आले. बाबासाहेबांवर तथागत गौतम बुध्द व त्यांचे विचार यांचा खोलवरप्रभाव होता. गौतम बुध्दांची वैश्विक विचारांची धुरा ते आपसूकच आपल्या बहुजन समाजावर सोपवतात - "भीम वामनला माझ्या म्हणाला बाळ विसरु नको गौतमाला तोच त्याला अभिप्रेत होता मला समते"[१०]

आंबेडकरांच्या मार्गाने चालण्याचा ध्यास घेतलेले वामनदादा त्यांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट स्वतः आत्मसात केल्याशिवाय आपल्या गांजलेल्या बहुजन समाजाने देखील तथागत गौतम बुध्द व त्यांची विचारधारा अशीच पुढे न्यावी यासाठी आपल्या गीतलेखनातून प्रबोधन केले. आई-वडील आपल्या मुलांसाठी संस्कारांचा अमूल्य ठेवा माघारी ठेवून जातात आणि तसाच अलौकिक ठेवा तथागत गौतम बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकर माघारी आपल्या बाळांसाठी ठेवून गेले आहेत व तोच आता आपल्याला जतन करत पुढे घेऊन जायचा आहे, असे वामनदादा सांगतात. आपल्याला दलितेतर समाजासोबत, आधीची गुलामगिरी मागे टाकत पुढे जायचे असेल तर आपल्या माय-बाप असणा-या या दोन महान व्यक्तींनी आपल्यासाठी मागे ठेवलेला वैचारिक व संजीवन-खजिना सोबत घेऊन जावे लागेल तसेच तो जपावादेखील लागेल, हेच वामनदादा सांगू पहात आहे. तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीला धरूनच पुढे जाणारे वामनदादा मूर्ती पूजेला विरोध करतात व आपल्यासाठी आपला जन्मोजन्मीचा उद्धार करणा-या या दोघांसमोरच आपण नतमस्तक आहोत आणि हेच सर्व काही असून त्यांची पूजा हीच एक मोठी व महान बाब आपल्यासाठी आहे वामनदादा म्हणतात -

"करीते पूजा मी आधी गौतमाची मिळाली मला ही देणगी भीमाची...
साहिले किती मी चटके उन्हाचे उपकार होता करूणाघनाचे
पायधूळ झाले नव्या आश्रमाची...
आणिले भीमाने मला या विहारी
इथं दर्शनाची मोकळीक सारी जाचणी दिसेना वर्णाश्रमाची..."[११]

वामनदादा यांच्या दृष्टीने आपला उद्धार करणारे हे दोन महान पुरूष हेच आपल्यासाठी पुजेस पात्र आहेत.

**निष्कर्ष व मूल्यमापन :**

गौतम बुद्ध यांच्यामुळेच आपल्याला बाबासाहेब मिळाले याची जाणीव वामनदादा यांना असल्याने ते म्हणतात म्हणूनच मी गौतमाची पूजा करतो आणि मला तसे करण्यात अभिमान व आनंद आहे आधीच्या काळात जातीयतेच्या जोखडात अडकल्याने सातत्याने मानहानी, पशुतुल्य जीवन आपल्या वाट्याला आले. जीवन जगत असताना श्वास घ्यायलादेखील मोकळीक नव्हती, इतके या समाजाने गुलाम करून टाकले होते. आज अशी माणूस म्हणून जगण्याची जी पर्वणी प्राप्त झालेली आहे, माझ्यावर माय-बापाने केलेले हे उपकार न फिटणारे असेच आहे. कारण आधी पशुला नव्हता इतका जाच, अन्याय सहन करावा लागला. कुत्र्याप्रमाणे मंदिरातून हाकलून दिले किंवा मंदिराची पायरी चढू दिली नाही आपल्यामुळे विटाळ होणा-या समाजाचे मस्तक ठिकाणावर आणण्याचे काम यांनी केले. माणूस म्हणून नवे जीवन ओंजळीत ओतले. आता आपल्याला ते जपत पुढे घेवून जायचे आहे आणि या दोन महान व्यक्तींशिवाय दुसरी कोणतीही पूजा-पाठ आपल्यासाठी नाही. आपण जर असे केलेच तर खूप मोठा अपराध असेल आणि आपण स्वतःच्या नजरेत देखील कधी अभिमानाने उभे राहू शकणार नाही. आपल्याला कृतघ्न होऊन चालणार नाही. प्रामाणिकपणे उपकाराची जाण ठेवत हा ठेवा आपण जपायला हवा. अशाप्रकारे वामनदादा यांच्या लेखणीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा तसेच तथागत गौतम बुद्ध यांच्या विचारांचा खूप

मोठा प्रभाव पडलेला आहे. त्यांच्या गीतलेखनावर आंबेडकरांच्या वैश्विक विचारांचा खोलवर परिणाम झालेला आहे. आंबेडकरांचे विचार आणखी चिरतरूण ठेवण्यासाठी ते गीतांचा मार्ग स्वीकारून पुढे जातात आंबेडकरांचा प्रत्यक्ष सहवास लाभल्याने वामनदादा यांचा वैचारिक पाया आणखी भक्कम होत गेला आणि त्याची छाप त्यांच्या गीतांतून दिसून आली असे म्हणावे लागेल.

**संदर्भग्रंथ सुची:**


१) शेजवळ शरद, वाळके प्रमोद (संपादक), आंबेडकरवादी गझलवेध, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १७ फेब्रुवारी २०१८, पृ. क्र. ५४

२) उ. नि. पृ. क्र. ५५

३) उ. नि. पृ. क्र. ७१

४) कर्डक वामन मोहळ, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, नववी आवृत्ती, १४ जानेवारी २०१६ पृ. क्र.

५) उ. नि. पृ. क्र. ५९

६) पृ. क्र. ६२

७) उ. नि. पृ. क्र. ६८

८) उ. नि. पृ. क्र. ७५

९) उ. नि. पृ. क्र. ८०

१०) उ. नि. पृ. क्र. ८७

११) उ. नि. प्र. क्र. ७५


◆◆◆◆◆




Scanned with CamScanner

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal
MAH MAR 34737/13/1/2009-TC



माणसा इथे मी तुझे गीत गावे
असे गीत गावे तुझे हीत व्हावे ।।धृ।।

असे गोड नाते तुझ्याशी जडावे
तुझ्या संकटाशी इथे मी लढावे ।।१।।

तुझ्याच भुकेचे कोडे उलगडावे
तुझे दु:ख सारे गळूनी पडावे ।।२।।

एकाने हसावे लाखाने रडावे
जुने सारे सारे असे ना उरावे ।।३।।

इथे सारे सारे नवे पेरताना
वामनापरी मी तुझे हात व्हावे ।।४।।

- लोककवी वामनदादा कर्डक

हा अंक मालक, मुद्रक, प्रकाशक, शिवाजी हुसे यांनी रूद्रायणी ऑफसेट, सिडको, औरंगाबाद येथे छापून 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे प्रसिद्ध केला.
E-mail : editortiphan2009@gmail.com

Scanned with CamScanner

माणसा इथे मी तुझे गीत गावे । असे गीत गावे, तुझे हीत व्हावे।।

विजय शिक्षण प्रसारक मंडळ औरंगाबाद संचलित,

# दगडोजीराव देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

वाळूज, ता. गंगापूर जि. औरंगाबाद, (नॅक-बी दर्जा प्राप्त),

**मराठी भाषा व वाङ्मय विभाग,**

**भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद,** औरंगाबाद आणि

**त्रैमासिक तिफण** यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित



## लोककवी वामनदादा कर्डक

यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त

## एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

## विषय : लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि वाङ्मय

शुक्रवार, दि. २९ ऑक्टो. २०२१

# ।। प्रमाणपत्र ।।

प्रा.डॉ. मंगळ कचरू सांगळे, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर

यांनी दि. २९ ऑक्टोबर २०२१ रोजी लोककवी वामनदादा कर्डक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या 'लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावर मराठी भाषा व वाङ्मय विभाग, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद आणि त्रैमासिक तिफण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवशीय राष्ट्रीय चर्चासत्रात मार्गदर्शक / सत्राध्यक्ष / निबंधवाचक म्हणून सहभाग घेऊन लोककवी वामनदादा कर्डक यांचे गीतलेखन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर शोधनिबंध सादर केला. करीता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| प्राचार्य | अध्यक्ष | संपादक | संयोजक | समन्वयक |
|---|---|---|---|---|
| डॉ. संजय सांभाळकर | प्रा.डॉ. सर्जेराव जिगे | प्रा.डॉ. शिवाजी हुसे | प्रा. डॉ. युवराज धबडगे | प्रा. नागेश बोंतेवाड |
| दगडोजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज | भा.सा.सं. आणि सं.परिषद | त्रैमासिक - तिफण | मराठी विभागप्रमुख | मराठी विभाग |

Scanned with CamScanner